# सांगली जिल्हा परिषद, सांगली.

## वित्त विभाग

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली ता.-मिरज, जि.-सांगली

फोन नं.०२३३-२३७२८६५ Email ID - cafozpsangli@yahoo.in


जा.

क्रं./जिपसां/विवि/जी.एस.टी./३६२/२०१८, दि. ३ /०२/२०१८

**वस्तु व सेवा कर (G.S.T.) कायदा अंमलबजावणीबाबत**

# परिपत्रक

**संदर्भ :-** १) वित्त विभाग, जि.प. सांगली कडील परिपत्रक जाक्र. जिपसां/विवि/GST /२१८१ /२०१७ दि. ७/९/२०१७

२) केंद्रिय वित्त मंत्रालय भारत सरकार यांचे दि.०६/१०/२०१७ रोजी केंद्रिय वस्तु व सेवा कर कायदा २०१७ चे २२ व्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना -**

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तत्पश्चातचे कालावधीत उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद प्रमाणे केंद्रिय वित्त मंत्रालयाची वस्तु व सेवा कर कायदा २०१७ मधील सुधारणांविषयक २२वी बैठक दि. ०६/१०/२०१७ रोजी पार पडली असून सदर बैठकीचे इतिवृत्त दि. ३०/१०/२०१७ रोजी निर्गमित करणेत आलेली आहे. सदर इतिवृत्तानुरुप शासकीय कामांच्या कंत्राटातून GST ची रक्कम कपात करणेबाबत सुधारित आदेश प्राप्त झाले आहेत. त्याअनुरुप खालील प्रमाणे सूचना निर्गमित करणेत येत आहे.

१. संदर्भ क्र. १ मधील परिपत्रकातील परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद GST ची नोंदणी करुन घेणे बाबतची तरतूद दि. ३१/०३/२०१८ अखेर पर्यंत वाढविणेत आलेली आहे. याची सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

२. संदर्भ क्र. १ मधील परिपत्रकातील परिच्छेद क्र. ८ (I) चे नुसार बांधकाम विषयक देयकातून २ टक्के GST रक्कम कपात करुन संकीर्ण अनामत जमा खाती राखून ठेवणेबाबत निर्देश देण्यात आले होते. सदर तरतूद संदर्भ क्र. २ च्या इतिवृत्तानुसार स्थगित करण्यात येवून यापुढे रु.२.५० लक्ष चे आतील व त्यापेक्षा जास्त कंत्राट रक्कम असलेल्या देयकांतून २ टक्के GST ची रक्कम दि.३१/०३/२०१८ पर्यंत कपात करणेची आवश्यकता नाही. तथापि काम दि. ०१ जुलै २०१७ पूर्वी पूर्ण झाले असल्यास VAT विषयक तरतूदी कायम राहतील.

३. GST कराचे समावेश मूळ अंदाजपत्रक तथा Recapitulation sheet मध्ये करणेत आला असल्यास GST च्या अनुषंगाने संभ्रम निर्माण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, ज्या प्रकरणी मूळ अंदाजपत्रक तथा Recapitulation sheet मध्ये GST चा अंतर्भाव करण्यात आला नसेल, अशा प्रकरणी कंत्राटदाराने निविदा सादर करताना GST सह सर्वच प्रचलित कर, शुल्क, उपकर इ. बाबी विचारात घेतल्यां असल्याने, अशा प्रकरणी कंत्राटदाराची निविदा ही सर्व

प्रचलित कर, शुल्क, उपकर इ. सह असल्यामुळे कंत्राटदारास वेगळ्याने GST चे प्रदान करण्याची आवश्यकता नाही हे स्वयंस्पष्ट आहे. तथापि, याबाबतीत कंत्राटदाराकडून भविष्यात अनाठायी व अवाजवी मागणी केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून अशा प्रकरणी कंत्राटदाराकडून त्याने निविदा सादर करताना *" सर्व प्रचलित कर, शुल्क, उपकर इ. बाबी विचारात घेतल्या असल्याचे आणि कंत्राटदार वेगळ्याने GST ची मागणी करणार नसल्याचे तसेच, नियमानुसार GST चा भरणा करण्यास तो बांधील असल्याचे आणि दिनांक ०१/०४/२०१८ नंतर GST च्या TDS साठी सहमत असल्याचे"* बंधपत्र घेणे आवश्यक राहील.

४. संदर्भ क्र. १ मधील परिपत्रकातील परिच्छेद क्र. ८ (II) नुसार वस्तु व सेवा विषयक पुरवठ्यामधून GST कपात करावयाची तरतूद नमूद केली होती तथापि संदर्भ क्र. ७ च्या इतिवृत्तानुसार तात्पुरती स्थगित करण्यात येवून यापुढे रु.२.५० लक्ष चे आतील व त्यापेक्षा जास्त कंत्राट रक्कम असलेल्या देयकांतून २ टक्के GST ची रक्कम दि.३१/०३/२०१८ पर्यंत कपात करणेची आवश्यकता नाही. तथापि पुरवठा दि. ०१ जुलै २०१७ पूर्वी पूर्ण झाले असल्यास VAT विषयक तरतूदी कायम राहतील.

सदर परिपत्रक सुलभ संदर्भासाठी निर्गमित करणेत येत असून अधिक तपशिलवार माहितीसाठी वस्तु व सेवा कर अधिनियम, वेळोवेळी शासनाद्वारे निर्गमित शासन निर्णय व परिपत्रके यांचे अवलोकन करावे. याशिवाय कोणत्याही मुद्याच्या संदर्भात समस्या उद्‌भवल्यास किंवा अधिक मार्गदर्शनाची आवश्यकता भासल्यास मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सांगली जिल्हा परिषद, सांगली यांचेशी व्यक्तिशः संपर्क साधावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
सांगली जिल्हा परिषद, सांगली.

प्रत:-

१) अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली जिल्हा परिषद, सांगली.
२) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सांगली.
३) खातेप्रमुख (सर्व)-------------------, सांगली जिल्हा परिषद, सांगली.
४) वित्त विभाग, भांडार शाखा /- सदर परिपत्रकाची प्रत जिल्हा परिषदेचे संकेतस्थळावर प्रकाशित करणेचे आहे.
५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जि.प.सांगली /उपमुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.), जि.प.सांगली / जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली / जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.सांगली /गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व),------------------------

२/- आपले अधिनस्त असणाऱ्या सर्व आहरण व संवितरण अधिका-यांना GST नोंदणी करुन घेवून त्याबाबतची कार्यवाही करुन घेणेची जबाबदारी ही सर्वस्वी आपली असल्याने आपले अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांना आपले स्तरावरुन याबाबत स्वतंत्र सुचना निर्गमित करणेत याव्यात.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
सांगली जिल्हा परिषद, सांगली.